नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक १८/०८/२०२६ (मंगळवार )**

........................................................................................................................

## घरफोडीच्या गुन्हयातील आरोपी अटक
## स्थानिक गुन्हे शाखा नागपूर ग्रामीण यांची कामगिरी

मा. श्री हर्ष ए. पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक नागपुर ग्रामीण जिल्हा आणि श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा यांच्या मार्गदर्शनात दिनांक १७/०८/२०२६ रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पथक सावनेर उपविभागात उघड न झालेल्या गुन्हयांचा तपास करीत असतांना पोलीस ठाणे कळमेश्वर दाखल अप. क्र. ६१३/२६ कलम ३३१(३) ,३३१(४), ३०५(अ) भा.न्या.सं. सदर गुन्हयाचा समांतर तपास करीत असताना गुप्त बातमीदार आणि तांत्रिक पुराव्याच्या आधारे आरोपी आदेश उर्फ आद्या दुर्गादास तिरपुडे, वय २७ वर्ष, रा. महादुला कोराडी नागपूर याचा सदर गुन्हयात सहभाग असल्याची माहिती मिळाली. सदर आरोपीचा शोध घेऊन आरोपीला फेटरी ते गोंडखैरी हायवे रोड वर मोपेड वाहनासह दि. १७/०८/२०२६ रोजी ताब्यात घेऊन आरोपीकडे कौशल्यापुर्ण विचारपुस केली असता आरोपीने त्याचा साथीदार संमेत उर्फ पोंग्या दाभणे, रा. सुभाष नगर नागपूर याचेसह सदर गुन्हा केल्याची कबुली दिली. आरोपी क्रमांक २ हा कारागृहात असल्याची माहिती प्राप्त झाली.

**पोलीसांनी पंचासमक्ष एक होंडा कंपनीची डीओ मोपेड क्रमांक एम एच –४०/डी एच– २६१४ किंमती ५०,०००/– रुपयांचा मुद्देमाल पंचासमक्ष जप्त केला आहे. आरोपीला अटक करण्यात आली आहे.**




## अवैधरित्या ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळणाऱ्या १० आरोपीतांविरूध्द गुन्हा नोंद, रोख रक्कम व ०८ मोटरसायकलसह ५ लाख ५३ हजार ७५० रूपयांचा मुद्देमाल जप्त

## कोंढाळी पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन कोंढाळी** :— दिनांक १७/०८/२०२६ रोजी कोंढाळी पोलीसांना गुप्त बातमीदारा मार्फत खात्रीशीर माहीती मिळाली की, पोलीस ठाणे कोंढाळी हद्दीतील शिवा शिवार येथे सार्वजनिक ठिकाणी काही इसम ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळत आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीस घटनास्थळी पोहचले असता, नमुद घटनास्थळी काही इसम ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळताना दिसुन आले. पोलीसांनी **आरोपी नामे १) आकाश केशव राउत, वय २७ वर्ष, २) देविदास मनीराम देशभ्रतार, वय ५० वर्ष, ३) अवतारसिंग गुमानसिंग ताक, वय ४२ वर्ष, वरिल तीन रा. शिवा ता.जि. नागपूर ४) सुधाकर मोतीराम ढोणे, वय ४८ वर्ष, ५) नितेश रमेश खरबडे, वय ३१ वर्ष, वरिल आरोपी क्र. ४ व ५ रा. देवळी काळबांडे ता. हिंगणा** यांना ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळताना जागीच पकडले. **आरोपी ६) रोशन दत्तुजी पन्नासे, ७) पियुष गावंडे ८) पियुश देशभ्रतार, तिन्ही रा. शिवा ९) अरूण परतेती १०) रवी दहाट, दोन्ही रा. गौराळा, ता. हिंगणा हे सुध्दा वरील अवैधरित्या जुगार खेळत असल्याची माहीती पोलीसांना प्राप्त झाली.** पोलीसांनी घटनास्थळावरून ५२ तासपत्ते आणि रोख रक्कम १३,७५०/—रूपये, ०८ मोटरसायकल असा एकूण किंमती ५,५३,७५०/— रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

**नमुद १० आरोपीतांविरूद्ध पोलीस स्टेशन कोंढाळी येथे कलम १२ महाराष्ट्र जुगार अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.**




## अवैधरित्या ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळणाऱ्या आरोपीतांविरूध्द २ गुन्हे नोंद, रोख रक्कम व ०३ मोटरसायकल, ०७ मोबाईलसह २ लाख २९ हजार ३०० रूपयांचा मुद्देमाल जप्त
## पाचगाव पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन पाचगाव** :— दिनांक १७/०८/२०२६ रोजी पाचगाव पोलीसांना गोपनिय माहीतीवरून ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळणाऱ्या इसमांवर कारवाई करत दोन गुन्हे नोंद केले आहे. **दोन्ही कारवाई मध्ये एकुण २,२९,३००/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला.**

धामना हनुमान मंदीर समोरील मोकळया जागेत सार्वजनिक ठिकाणी **आरोपी नामे १) आकाश अशोक जोगे, वय २७ वर्ष, रा. पिपळाफाटा, ता. जि. नागपूर २) अश्वीन कवडुजी वरठी, वय ३९ वर्ष, रा. धामना, ता. जि. नागपूर ३) पवन मोहन काष्टे, वय २८ वर्ष, रा. धामना ता. जि. नागपूर, ४) अजय हरीप्रसाद बुरबुरे, वय ४७ वर्ष, रा. धामना ता. जि. नागपूर ५) मारोती राजाराम मिसाळ, वय ५२ वर्ष, रा. ता. उमरेड, जि. नागपूर ६) देवीदास मोहन कुबरे, वय ३३ वर्ष, रा. धामना ता. जि. नागपूर** यांना ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळताना मिळुन आले. पोलीसांनी घटनास्थळावरून ५२ तासपत्ते आणि रोख रक्कम ५८००/—रूपये, ०३ मोटरसायकल किंमती १,५०,०००/—रूपये, ०३ अँड्रॉईड मोबाईल किंमती ३०,०००/—रूपये असा एकूण किंमती १,८५,८००/— रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

पोलीस ठाणे पाचगाव हद्दीतील कळमना स्मशान घाट येथे मोकळया जागेत सार्वजनिक ठिकाणी **आरोपी नामे १) विजय दुर्गाजी मस्के, वय ४२ वर्ष, रा. कळमना, ता. जि. नागपूर २) आशिष सुखदेव बांगडे, वय २७ वर्ष, रा. कळमना, ता. जि. नागपूर ३) निखील विनोद भोयर, वय २५ वर्ष, रा. कळमना, ता. जि. नागपूर ४) दिपक राधे वर्मा, वय २९ वर्ष, रा. कळमना, ता. जि. नागपूर ५) कार्तिक नरेंद्र सतिबावणे, वय १८ वर्ष, रा. कळमना, ता. जि. नागपूर** यांना ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळताना मिळुन आले. पोलीसांनी घटनास्थळावरून ५२ तासपत्ते आणि रोख रक्कम ३५००/—रूपये, ०४ अँड्रॉईड मोबाईल किंमती ४०,०००/—रूपये असा एकूण किंमती ४३,५००/— रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

**दोन्ही कारवाई मध्ये एकुण २,२९,३००/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला. नमुद आरोपीतांविरूद्ध पोलीस स्टेशन पाचगाव येथे कलम १२ महाराष्ट्र जुगार अधिनियम अन्वये दोन गुन्हे नोंद करण्यात आला आहे.**



## अवैधरित्या ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळणाऱ्या आरोपीतांविरूध्द ०२ गुन्हे नोंद,नरखेड पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन नरखेड** :— दिनांक १७/०८/२०२६ रोजी नरखेड पोलीसांना गोपनीय माहीतीवरून ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळणाऱ्या इसमांवर कारवाई करत दोन गुन्हे नोंद केले आहे.

पोलीस ठाणे नरखेड हद्दीतील गणेशपुर रोड मोवाड येथे सार्वजनिक ठिकाणी **आरोपी नामे १) योगेश विठ्ठल वघाळे, वय ३५ वर्ष, रा. गणेशपुर, ता. वरूड, जि. अमरावती २) संजय धोंडबाजी दुईजोड, वय ५१ वर्ष, रा. गणेशपुर, ता. वरूड, जि. अमरावती ३) आकाश साहेबराव भारसकरे, वय ३० वर्ष, रा. गणेशपुर, ता. वरूड, जि. अमरावती ४) आर उर्फ रोशन भिमराव भाजीखाये, वय ३४ वर्ष, रा. गणेशपुर, ता. वरूड, जि. अमरावती ५) विशाल बाबाराव बारई, वय ३२ वर्ष, रा. गणेशपुर, ता. वरूड, जि. अमरावती ६) अजय मोतीराम निमजे, वय ४६ वर्ष, रा. वार्ड क्र ६, मोवाड, ता. नरखेड हे** यांना ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळताना मिळुन आले. पोलीसांनी घटनास्थळावरून ५२

तासपत्ते आणि रोख रक्कम ३३००/—रूपये असा एकूण ३३००/—रूपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

गणेशपुर रोड मोवाड येथे सार्वजनिक ठिकाणी **आरोपी नामे १) योगेश नरहरी पुरी, वय २४ वर्ष, रा. वार्ड क्र. ०५, बेलोना तह. नरखेड ०२) सुनिल जगन फुसे, वय ३० वर्षे, रा.येरला पावडे, रा. तह नरखेड ०३) हरीष ईश्वरसिंग सुरवार, वय २६ वर्षे, रा. वार्ड क्र. ०५, बेलोना तह नरखेड ०४) पियुष नेपालसिंग डुंगरावत, वय १९ वर्षे, रा. वार्ड क्र. ०४, बेलोना तह नरखेड ०५) देवेंद्र चंक्रधर सुळे, वय २८ वर्षे, रा. येरला पावडे तह नरखेड ०६) नारायण दशरथ फुसे, वय ४० वर्षे, रा. प्रेरला पावडे, तह नरखेड** हे ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळताना मिळुन आले. पोलीसांनी घटनास्थळावरून ५२ तासपत्ते आणि रोख रक्कम १७५०/— रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

**दोन्ही कारवाईमध्ये एकुण ५०५०/— रूपयाचा मुद्देमाल जप्त केला. नमुद आरोपीतांविरूद्ध पोलीस स्टेशन नरखेड येथे कलम १२ महाराष्ट्र जुगार अधिनियम अन्वये ०२ गुन्हे नोंद करण्यात आले आहे.**

## कोंढाळी पोलीस स्टेशन हद्दीतील अवैध दारू व्यवसायातील ९ सराईत गुन्हेगारांना नागपुर जिल्हयातुन केले हद्दपार

**पोलीस स्टेशन कोंढाळी हद्द्तीतील अवैध दारू व्यवसायातील सराईत आरोपी १) राजु जगन्नाथ जैयस्वाल वय ५१ वर्ष रा. चाकडोह ता काटोल,२) नरसिंग मुलचंद जाधव वय ३६ वर्ष रा. माहुरखोरा ता काटोल,३) जयराम पालसिंग राठोड, वय ४३ वर्ष, रा माहुरखोरा ता काटोल ,४) नागेश भाउराव नेहारे, वय २६ वर्ष, रा कातलाबोडी ता काटोल,५) जाफर इब्राहीम शेख, वय ६१ वर्ष, रा धोतीवाडा ता काटोल,६) संदीप महादेव ढोके, वय ४० वर्ष, रा धोतीवाडा, ता काटोल ७) सौ. रंजना विजय राजपूर, वय ४० वर्ष, रा सोनमोह ता काटोल ,८) सौ रिना मनोज मारवाडी, वय ३२ वर्ष, रा सोनमोह ,ता काटोल ,९) सौ. रईबाई गणेश मारवाडी, वय ३८ वर्ष, रा. सोनमोह ता काटोल,यांना महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ५६ (१) (अ) अन्वये हद्दपार करण्यात आले आहे.**

वर नमुद सराईत आरोपी **यांचेवर** अवैध दारू बाबत **अनेक गुन्हे नोंद** आहे. नमुद आरोपींचे गुन्हेगारी नमुद आरोपींचे गुन्हेगारी कृत्यांवर नियंत्रण ठेवण्याकरीता पोलीसांनी

वेळोवेळी त्यांचे वर कारवाई करून गुन्हे नोंद केले तसेच त्यांचेवर प्रतिबंधक कार्यवाही सुध्दा केली आहे. परंतु आरोपी यांनी आपली गुन्हेगारी गतिविधी निरंतर सुरूच ठेवली. आरोपींच्या गुन्हेगारी कृत्यामुळे परीसरातील अनेकांना दारूचे व्यसन जडले आहे. तसेच त्यांच्या कृत्यामुळे शांततेचा भंग होवुन कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची दाट शक्यता असल्यामुळे नमुद आरोपींचा महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ५६ (१) (अ) अन्वये हद्दपार करण्याचा प्रस्ताव कोंढाळी पोलीसांनी उपविभागिय पोलीस अधिकारी, काटोल यांच्या मार्फतीने उपविभागिय दंडाधिकारी, काटोल यांचे कडे पाठविला असता त्यांनी प्रस्ताव मंजुर करून वर नमुद १) राजु जगन्नाथ जैयस्वाल आणि २) नरसिंग मुलचंद जाधव यांना २ महीन्याकरीता, ३) जयराम पालसिंग राठोड ,४) नागेश भाउराव नेहारे ,५) जाफर इब्राहीम शेख ,६) संदीप महादेव ढोके यांना १ महीन्याकरीता तसेच आरोपी क्र ७) रंजना विजय राजपूर ८) रिना मनोज मारवाडी वय ९) रईबाई गणेश मारवाडी यांना १५ दिवसांकरीता नागपुर जिल्हयातुन हद्दपार केले आहे.

**नागपुर ग्रामीण जिल्हा पोलीसांतर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, नमुद आरोपी हे नागपुर ग्रामीण व नागपुर जिल्हा हद्दीत दिसुन आल्यास नजिकच्या पोलीस स्टेशनला तात्काळ माहीती द्यावी.**



राजु जगन्नाथ जैयस्वाल



नरसिंग मुलचंद जाधव



जयराम पालसिंग राठोड



नागेश भाउराव नेहारे



जाफर इब्राहीम शेख



संदीप महादेव ढोके

# नरखेड पोलीस स्टेशन हद्दीतील हदद्दीतील अवैध दारू व्यवसायातील सराईत गुन्हेगाराला नागपुर जिल्हयातुन केले हद्दपार

पोलीस स्टेशन नरखेड हदद्दीतील अवैध दारू व्यवसायातील सक्रिय आरोपी **तानाजी सिताराम ढोबळे वय ५६ वर्षे रा. मोहगाव भदाडे ता. नरखेड याला** महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ५६ (१) (अ) अन्वये नागपुर जिल्हयातुन हद्दपार केले आहे.

सराईत गुन्हेगार नामे **तानाजी सिताराम ढोबळे वय ५६ वर्षे रा.मोहगाव भदाडे ता. नरखेड यांचे**वर अवैध दारू बाबत **अनेक गुन्हे नोंद** आहे. नमुद आरोपीचे गुन्हेगारी कृत्यांवर नियंत्रण ठेवण्याकरीता पोलीसांनी वेळोवेळी त्यांचे वर कारवाई करून गुन्हे नोंद केले तसेच त्यांचेवर प्रतिबंधक कार्यवाही सुध्दा केली आहे. परंतु आरोपी याने आपली गुन्हेगारी गतिविधी निरंतर सुरूच ठेवली. आरोपीच्या गुन्हेगारी कृत्यामुळे परीसरातील अनेकांना दारूचे व्यसन जडले आहे. तसेच त्यांच्या कृत्यामुळे शांततेचा भंग होवुन कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची दाट शक्यता असल्यामुळे नमुद आरोपीचा महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ५६ (१) (अ) अन्वये हद्दपार करण्याचा प्रस्ताव नरखेड पोलीसांनी उपविभागिय पोलीस अधिकारी, काटोल यांच्या मार्फतीने उपविभागिय दंडाधिकारी, काटोल यांचे कडे पाठविला

असता त्यांनी प्रस्ताव मंजुर करून वर नमुद आरोपी **तानाजी सिताराम ढोबळे, वय ५६ वर्षे रा.मोहगाव भदाडे ता. नरखेड याला २ महीन्यांकरीता** नागपुर जिल्हयातुन हद्दपार केले आहे.

**नागपुर ग्रामीण जिल्हा पोलीसांतर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, नमुद आरोपी नागपुर ग्रामीण व नागपुर जिल्हा हद्दीत दिसुन आल्यास नजिकच्या पोलीस स्टेशनला तात्काळ माहीती द्यावी.**



**तानाजी सिताराम ढोबळे**

## अवैधरित्या विनापरवाना दारू काढणारे तसेच सेवन करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध ०६ गुन्हे नोंद

दिनांक १७/०८/२०२६ रोजी दारूबंदी कायदा अंतर्गत विविध पोलीस स्टेशनला पोलीसांनी अवैधरित्या दारू बाळगुन विक्री करणाऱ्यांवर छापा टाकुन मोहाफुल दारू असा एकुण १०००/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला. महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम अन्वये एकुण ०६ गुन्हे दाखल करण्यात आले आहे.

**पोलीस स्टेशन नरखेड** येथे आरोपी नामे राजेश उर्फ राजा गुलाब ईसके, वय ४२ वर्ष, रा. वार्ड क्र ०३, मोवाड तह नरखेड, जि. नागपुर याचेवर १ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन देवलापार येथे** आरोपी नामे १) नंदु फकीरा उईके, वय ७० वर्ष, रा. नवेगाव बेलदा २) बबलु बंसीलाल मनो, रा. पिंडकापार ता. रामटेक यांचेवर ०१ गुन्हा ३) शशीकांत सहदेव वरठी, वय ३४ वर्ष, रा. सिंदेवानी, ता. रामटेक यांचेवर १ गुन्हा असे ०२ गुन्हे नोंद, **पोलीस स्टेशन कुही** येथे आरोपी नामे झिबल वसंता तलमले, वय ४२ वर्ष, रा. काळेश्वर मंदिर जवळ कुही, ता. कुही याचेवर १ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन** खापा **येथे** आरोपी नामे रविंद्र फुलचंद नेटी, वय ३० वर्ष, रा. बावनगाव, ता. सावनेर याचेवर १ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन सावनेर येथे** आरोपी नामे मुकेश वसंता उईके, वय ३० वर्ष, रा. वडार मोहल्ला पहलेपार सावनेर याचेवर ०१ गुन्हा नोंद,

**नमुद कारवाईत एकुण १० लिटर मोहाफुल दारू असा एकुण १०००/— रूपयांचा मुद्देमाल मिळून आल्याने नाशवंत मुद्देमाल मौक्यावर पंचनामा कार्यवाही करून नष्ट करण्यात आला.**

## नागपुर ग्रामीण जिल्ह्यातील ७१२ रेकॉर्डवरील आरोपीतांची घेण्यात आली आरोपी परेड

मा. श्री हर्ष ए. पोद्दार, वरीष्ठ पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा आणि श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा यांच्या मार्गदर्शनात आज दिनांक १८/०८/२०२६ रोजी नागपुर ग्रामीण जिल्हयातील सर्व २४ पोलीस स्टेशनला शरीराविरूध्दचे गुन्हे करणारे, मालमत्ते विरूध्दचे गुन्हे करणारे, महीला व बाल अत्याचार

गुन्हेगार ,अवैध दारू, जुगार इतर अवैध धंदयामधील रेकॉर्डवरील आरोपींतांची आरोपी परेड घेण्यात आली आहे. **एकुण ७१२ आरोपीतांची आरोपी परेड घेण्यात आली आहे.**

**नागपुर उपविभाग** :— नागपुर उपविभागातील पोलीस स्टेशन बुट्टीबोरी येथे ३० आरोपी, पोलीस स्टेशन एमआयडीसी बोरी येथे ३० आरोपी आणि पोलीस स्टेशन बेला येथे ३३ आरोपी अशा एकुण ९३ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**उमरेड उपविभाग** :— उमरेड उपविभागातील पोलीस स्टेशन उमरेड येथे ३८ आरोपी , पोलीस स्टेशन कुही येथे २५ आरोपी आणि पोलीस स्टेशन भिवापुर येथे २३ आणि पोलीस स्टेशन वेलतुर २८ आरोपी पोलीस स्टेशन पाचगाव १२ आरोपी अशा एकुण १२६ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**सावनेर उपविभाग :—** सावनेर उपविभागातील पोलीस स्टेशन सावनेर येथे ६० आरोपी , पोलीस स्टेशन कळमेश्वर येथे ३३ आरोपी आणि पोलीस स्टेशन खापा येथे १८ आरोपी आणि पोलीस स्टेशन केळवद येथे ३० आरोपी, पोलीस स्टेशन मोहपा येथे १७ आरोपी अशा एकुण १५८ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**कन्हान उपविभाग** :— कन्हान उपविभागातील पोलीस स्टेशन कन्हान येथे ३२ आरोपी , पोलीस स्टेशन मौदा येथे २० आरोपी पोलीस स्टेशन वडोदा येथे १८ आरोपी अशा एकुण ७० रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**रामटेक उपविभाग :—** रामटेक उपविभागातील पोलीस स्टेशन रामटेक येथे ३२ आरोपी , पोलीस स्टेशन पारशिवणी येथे ३२ आरोपी, पोलीस स्टेशन अरोली येथे २५ आरोपी आणि पोलीस स्टेशन देवलापार येथे २४ आरोपी अशा एकुण ११३ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**काटोल उपविभाग :—** काटोल उपविभागातील पोलीस स्टेशन काटोल येथे ५० आरोपी , पोलीस स्टेशन कोंढाळी येथे २९ आरोपी आणि पोलीस स्टेशन नरखेड येथे ४२ आरोपी आणि पोलीस स्टेशन जलालखेडा येथे ३१ आरोपी अशा एकुण १५२ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.









मा. पोलीस अधीक्षक
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
यांच्या मान्यतेने